# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

दुपार

**दिनांक १४.०५.२०२६ गुरूवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची दारूबंदी, मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक १३.०५.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत म.दा.का. व अंमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये ०८ केसेसमध्ये ०८ ईसमांवर कारवाई करून ४,४७५/—रू. चा मुद्देमाल जप्त केला आहे. तसेच, जुगार कायद्यान्वये ०१ केसमध्ये ०३ ईसमावर कारवाई करून २,१०५/—रू. चा मुद्देमाल जप्त केला आहे.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली ३,२८९ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. २,६७,४००/—रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) गुन्हेशाखा युनिट क्र. ५ पोलीसांची कामगिरी :— जिवे ठार मारण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपींना ३ तासाचे आंत अटक.**

पोलीस ठाणे यशोधरानगर हद्दीत, कळमना बस्ती, मानसी ले—आऊट, प्लॉट नं. १०४, बाबाताज कॉलोनी येथे राहणारे फिर्यादी नामे मुस्ताक खान करीम खान, वय २३ वर्षे व आरोपी हे एकमेकांचे ओळखीचे असून दिनांक १३.०५.२०२६ चे १३.३० वा. ते १४.०० वा. चे दरम्यान, जुन्या भांडणाच्या कारणावरून आरोपी क्र. १) मोहम्मद फैजान मोहम्मद अफजल अन्सारी, वय २६ वर्षे, रा. म्हाडा क्वॉटर, बिलाल नगर, यशोधरानगर, नागपूर २) तौफीक खान उर्फ बाबू नासीर खान, वय १८ वर्षे, रा. ईरा शाळेजवळ, पार्वती नगर, फुल बगीचा जवळ, कळमना, नागपूर ३) मोहम्मद अरबाज मोहम्मद सुभान अन्सारी, वय १८, वर्षे माजरी, यशोधरानगर, नागपूर व ४) शोएब लाला वय अंदाजे २५ वर्षे रा. बिलाल नगर, आजरी—माजरी, नागपूर यांनी संगणमत करून फिर्यादी व त्याचा भाऊ मुस्तकीन खान करीम खान, वय ३२ वर्षे यांना वांजरा ले—आऊट, रेल्वे क्रॉसिंग जवळ, म्हाडा क्वॉर्टर बिलाल नगर, पिवळी नदी, यशोधरानगर येथे हाबुक्कीने मारपीट केली. तसेच, आरोपी क्र. ४ याने फिर्यादीचे भावास जिवे मारण्याचे उद्देशाने चाकुने डोक्यावर, हनुवटीवर, नाकावर, मानेवर वार करून गंभीर जखमी केले. जखमी यांना उपचाराकरीता मेडीकल हॉस्पीटल, ट्रामा सेंटर येथे दाखल केले आहे., उपचार सुरू आहे. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे यशोधरानगर येथे आरोपींविरूध्द कलम १०९(१), ११५(२), २९६, ३(५) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे तपासादरम्यान, गुन्हेशाखा युनिट क्र. ०५ चे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी आरोपींचा शोध घेवून ०३ तासाचे आंत आरोपी १ ते ३ यांना ताब्यात घेवून पुढील कारवाई करीता यशोधरानगर पोलीसांचे ताब्यात दिले आहे. पाहीजे आरोपी क्र. ४ चा शोध व पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल, पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. वसंत परदेशी अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. राहुल माकणीकर, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. अभिजीत पाटील, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. विनायक गोल्हे, व त्यांचे पथकाने केली.



**<u>३) गुन्हेशाखा युनिट क्र. ३ पोलीसांची कामगिरी :— अग्नी शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक.</u>**

दिनांक १३.०५.२०२६ चे १९.०५ वा. ते २०.३० वा. चे दरम्यान, गुन्हेशाखा युनिट क्र. ३ चे अधिकारी व अंमलदार हे नागपूर शहरात गुन्हेगारांचे शोधात पेट्रोलींग करीत असता, मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून, पोलीस ठाणे नवीन कामठी हद्दीत आनंद नगर, रामगड, राजू गजभियेचे घरी किरायाने राहणारा ईसम नामे ईरफान हुसेन शेख, वय ३९ वर्ष यास ताब्यात घेवून पंचासमक्ष त्याचे घराची घरझडती घेतली असता, आरोपीचे ताब्यातून एक काळ्या रंगाची लोखंडी देशी बनावटीची पिस्टल मॅग्झीनसह व दोन जिवंत काडतूस असा एकुण किंमती अंदाजे ५६,०००/— रू. चा मुद्देमाल मिळून आल्याने जप्त करण्यात आला. आरोपी हा कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने अग्नीशस्त्र बाळगुन मिळुन आल्याने व त्यांनी मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे नवीन कामठी येथे आरोपीविरूध्द कलम ३/२५ भा.ह.का. शस्त्र सुधारणा अधिनियम (सुधारणा) २०१९ चे कलम ५(१)(अ) सहकलम २५(१)(अ), सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. आरोपीस मुद्द्देमालासह पुढील कार्यवाहीस्तव नवीन कामठी पोलीसांचे ताब्यात देण्यात आलेले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल, पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. वसंत परदेशी अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. राहुल माकणीकर, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. अभिजीत पाटील, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. महेश सागडे व त्यांचे पथकाने केली.



**४) नवीन कामठी पोलीसांची कामगिरी :— एम.डी. पावडर बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल पोलीस आयुक्त नागपूर शहर यांचे संकल्पनेतुन **''ऑपरेशन थंडर — एकत्र येवुया, नशामुक्त समाज घडवुया''** मोहीमेअंतर्गत अंमली पदार्थ विक्री करणारे तथा जवळ बाळगणारे तसेच, अंमली पदार्थाचे सेवन करणारे गुन्हेगारांविरूध्द कारवाई सुरू आहेत.

दिनांक १३.०५.२०२६ चे २२.४० वा. ते दिनांक १४.०५.२०२६ चे ००.५५ वा. चे दरम्यान, नवीन कामठी पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना, त्यांना मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून, न्यु येरखेडा, संविधान चौक, कामठी येथे बजाज पल्सर १२५ गाडी क्र. एम. एच. ४९ बि.वाय. ३४९९ ला थांबवुन चालकास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने आपले नाव अजय राधेलाल सोनानी, वय २८ वर्षे, रा. न्यु येरखेडा, संविधान चौक, कामठी, नागपुर असे सांगीतले. पंचासमक्ष त्याची व दुचाकीची झडती घेतली असता, त्याचे ताब्यात दोन झिपलॉक पन्नीमध्ये ०३.०० ग्रॅम एम.डी. पावडर किंमती ३०,०००/—रू. ची मिळुन आली. आरोपीचे ताब्यातुन एम.डी. पावडर, ०१ मोबाईल फोन, मोटारसायकल असा एकुण ९०,०००/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपी हा स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता एम.डी. पावडर विक्रीकरीता बाळगतांना समक्ष मिळुन आला. आरोपीचे कृत्य हे कलम ८(क), २२(ब) एन.डी. पी.एस.ॲक्ट १९८५ नुसार गुन्हा होत असल्याने, आरोपीविरूध्द पोलीस ठाणे नवीन कामठी येथे गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. आरोपीस अटक करण्यात आली आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल, पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे अपर पोलीस आयुक्त (उत्तर प्रभाग) नागपूर शहर, मा. श्री. डॉ. संदीप पखाले, पोलीस उप आयुक्त (परि. क्र. ६), मा. श्री अंकुश खेडकर सहा. पोलीस आयुक्त (कामठी विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. महेश आंधळे, सफौ. किशोर महंत व त्यांचे पथकाने केली.

## (गुन्हे)

**१) पोलीस ठाणे गणेशपेठ :— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक १३.०५.२०२६ चे ११.०० वा. ते १२.३० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे गणेशपेठ हद्दीत, प्लॉट नं. २०३, रतन प्लाझा, संत्रा मार्केट, नागपुर येथे राहणाऱ्या फिर्यादी श्रीमती भारती संदीप तिवारी, वय ५३ वर्षे ह्या आपले राहते घराला कुलुप लावुन त्यांचे पतिचे शिवमंदीर जवळील फार्मसीमध्ये जेवणाचा डबा देण्याकरीता गेल्या असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे घराचे मुख्य दाराचे कुलूप व कडी—कोंडा तोडुन, आंत प्रवेश करून, बेडरूममधील लोखंडी आलमारीतील रोख ७,००,०००/—रू. तसेच, सोन्या—चांदीचे वेगवेगळे दागिने असा एकुण किंमती ९,७५,०००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे गणेशपेठ येथे पोउपनि. अमित शेळके ९०७५६१७८१७ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ), ३३१(३), ३२४(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे गिट्टीखदान :— घातक शस्त्रे बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक १३.०५.२०२६ चे २३.५५ वा. चे सुमारास, गिट्टीखदान पोलीसांचे तपास पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना मिळालेल्या माहितीवरून, पोलीस ठाणे हद्दीत गोरेवाडा रिंग रोड अयप्पा मंदीर समोर रोडाचे कडेला लाल रंगाच्या वॉक्स वॅगन कार क्र. एम.एच. ०२ डी.झेड. ११३५ या कारजवळ जात असता, त्यातील तीन ईसम पोलीसांना पाहुन पळुन गेले. एक इसम गाडीमध्ये मिळाला त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव सय्यद जामील सय्यद जाहीद, वय २१ वर्षे, रा. स्मृती

कॉलोनी, बोखारा, कोराडी, नागपूर असे सांगीतले. त्यास विचारपूस केली असता, त्याने त्याचे पळालेले साथीदारांची नावे १) अजलान मोहीन काजी, वय २३ वर्षे, रा. जाफर नगर, नागपूर २) श्रेयस शेंदरे, वय २३ वर्षे, रा. डेप्युटी कॉलोनी, सिव्हील लाईन, नागपूर ३) ॲलन वय २६ वर्षे, रा. मार्टीन नगर असे सांगितले. तसेच, त्यांचे काल काही ईसमासी भांडण झाल्याचे सांगितले. पंचासमक्ष कारची झडती घेतली असता, कारचे डिक्कीमध्ये तीन लोखंडी कोयते, एक तलवार, व एक लोखंडी फरसा अशी शस्त्रे मिळून आली. आरोपीचे ताब्यातुन शस्त्रे व कार असा एकूण किंमती २,५१,४००/— रू. चा जप्त करण्यात आला.

आरोपी हे दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने शस्त्रे बाळगतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे गिट्टीखदान येथे आरोपीविरूध्द कलम ४, २५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, एका आरोपीस अटक केली आहे. व आरोपींचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**स्वा/—**

**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**